**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय**
पुणे महानगरपालिका, पुणे
जावक क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/११४७
दिनांक : २५।०५।२०२०

**-: आदेश :-**

विषय:- **कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**
देशांतर्गत विमान प्रवासाने येणाऱ्या प्रवाशांबाबत करावयाची कार्यवाहीबाबत.
संदर्भ :- महसूल व वनखाते, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DiSM-1, Dated : 25th May, 2020

संदर्भीय आदेशाद्वारे राज्य शासनाने देशांतर्गत विमान प्रवास करून पुणे विमानतळ येथे उतरणाऱ्या नागरिकांबाबत कशा पद्धतीने कार्यवाही करावी हे नमूद केले आहे. याकरिता विमानतळावर उपरोक्त संदर्भीय आदेशात नमूद प्रमाणे कार्यवाहीसाठी श्री. अशोक घोरपडे, मुख्य उद्यान अधिक्षक यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक या आदेशाद्वारे करण्यात येत आहे.

श्री. घोरपडे यांनी शासनाच्या संदर्भीय आदेशाप्रमाणे कार्यवाही विहित पद्धतीने पार पाडली जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच श्री. योगेश हेंद्रे, प्र. सहाय्यक जनसंपर्क अधिकारी यांनी या कामी श्री.घोरपडे यांचे सहाय्यक म्हणून काम पाहावे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाचे राजशिष्टाचार अधिकारी (Protocol Officer) श्री.अमृत नाटेकर यांच्या संपर्कात राहावे.

तसेच या करिता आवश्यक अन्य अधिकारी/कर्मचारी श्री. विजय दहिभाते, उप आयुक्त, परिमंडळ कार्यालय क्र. १ यांनी श्री. अशोक घोरपडे, मुख्य उद्यान अधिक्षक यांना या कामी उपलब्ध करून द्यावे.

तरी, श्री. घोरपडे यांनी शासन निदेशाप्रमाणे वेळोवेळी कार्यवाही करून, त्याबाबतचा अहवाल मा.महापालिका आयुक्त व मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/वि) यांचेकडे सादर करावा.

वरील अधिकारी यांची नियुक्ती या आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहे.

तरी वरील अधिकारी यांनी उपरोक्त आदेशानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करावी.

Rubal 25/5

(रुबल अग्रवाल)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

प्रत : १) मा. महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.
२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि/ई),
पुणे महानगरपालिका

यांचे माहितीस्तव सादर ...

प्रती: खातेप्रमुख (सर्व),
पुणे महानगरपालिका